अतितात्काळ/महत्वाचे

९५६२०/२८

जा.क्र.उमाशि-२/वाढीव पदे पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : २१/५/२०१२
24 MAY 2012

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे विभाग, पुणे

विषय :- खाजगी मान्यताप्राप्त अनुदानीत उच्च माध्यमिक शाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वाढीव पदांच्या मान्यतेबाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्रं.एचएससी/२००७-०८ वाढीव पदे/१२एचएस/४४७५८ दिनांक १८/५/२०१२

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रानुसार दिनांक १०/५/२०१२ रोजी शासनस्तरावर झालेल्या संयुक्त सचिव समितीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये प्रस्तावीत पदांना मान्यता मिळणेबाबत विभागाकडून सादर झालेल्या प्रस्तावावर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शै. वर्ष २००७-०८ २००८-०९ प २००९-१० मध्ये विभागनिहाय सादर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करावे. वाढीव पदे प्रस्तावीत करताना मंजूर करावयाच्या पदांच्या विषयाची त्यावेळी असलेली विद्यार्थी संख्या व ऑक्टोंबर २०११ मध्ये जिल्हाधिकारी यांच्यामार्फत झालेल्या पटपडताळणीमध्ये त्या विषयाची किती विद्यार्थी संख्या आहे. याची माहिती उच्च माध्यमिक शाळानिहाय सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहे. त्याचप्रमाणे पटपडताळणीमध्ये प्रस्तावीत केलेल्या पदांच्या विषयाची पटसंख्या कमी असल्यास प्रस्तावीत केलेले पद कमी होत असल्यास त्यानुसार अभिप्राय द्यावेत. व सुधारीत प्रस्ताव देण्यात यावा असे सूचीत करण्यात आले आहे. त्यानुसार उपरोक्त शैक्षणिक वर्षात आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रस्तावीत करण्यात आलेल्या पदांची विषयनिहाय विद्यार्थी संख्या ऑक्टोंबर २०११ मध्ये जिल्हाधिकारी यांच्यामार्फत झालेल्या पटपडताळणीनुसार प्रस्तावीत केलेल्या पदास उपलब्ध असलेली विद्यार्थी संख्या याची

माहिती सोबत जोडलेल्या तक्ता दिनांक २८/५/२०१२ रोजी व्यक्तिशः या कार्यालयात श्री जाधव व श्री मोरे यांच्याकडे सादर करावी.

सदरची माहिती दिनांक २८/५/२०१२ रोजी सादर न केल्यास व त्यानुसार सुधारीत प्रस्तावांमध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रस्तावीत पद समाविष्ठ न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची व्यक्तिशः असेल याची नोंद घ्यावी. उशिरा प्राप्त होणा-या माहिती स्विकारली जाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,
पुणे / सोलापूर / अहमदनगर
/- यांनी सदर माहितीस आपल्या जिल्हयांतील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी व उपरोक्त दिनांकास संबंधित सहा. शिक्षण उपनिरिक्षक यांना उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना दयावयात.

प्रपत्र

**शैक्षणिक वर्ष :**

| अ.क्र. | जिल्हा | कमवि/उमाविचे नांव | विषय | वाढीव पदांची संख्या | | पद प्रस्तावित करताना त्या विषयाची पटसंख्या | जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पटपडताळणीनुसार विद्यार्थी संख्या | तफावत | जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पटपडताळणीनुसार वाढीव पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्णवेळ | अर्धवेळ | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

(टिप : प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.)